# नेरूळ जिमखाना

**प्लॉट नं. ५/५ए, सेक्टर – २८,**
**नेरूळ, नवी मुंबई – ४०० ७०६**

## २१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त ...

नेरूळ जिमखान्याची २१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभा **रविवार दिनांक १६ डिसेंबर २०१८ रोजी सकाळी ठिक १०.००** वाजता **नेरूळ जिमखाना, प्लॉट नं. ५/५ए, सेक्टर–२८, नेरूळ, नवी मुंबई** या ठिकाणी व्यवस्थापन समितीचे सरचिटणीस श्री. हरशरणसिंग यांचे अधिपत्त्याखाली घेण्यात आली.

सदरच्या सभेस खालील प्रमाणे सदस्य मंचावर उपस्थित होते.

| अ.क्र. | सदस्याचे नांव |
|---|---|
| १. | श्री.विनू रैना (मा.अध्यक्ष, विश्वस्त मंडळ) |
| २. | डॉ.के.पी.शरीफ (मा.सचिव, विश्वस्त मंडळ) |
| ३. | श्री.कमलेश ठक्कर (मा.खजिनदार, विश्वस्त मंडळ) |
| ४. | श्री.कन्हैयालाल भुव (मा.सल्लागार, विश्वस्त मंडळ) |
| ५. | श्री.राजेश पुजारी (मा.सल्लागार, विश्वस्त मंडळ) |
| ६. | श्री.शशी पांडे (मा.संस्था अध्यक्ष, व्यवस्थापकीय समिती सन २०१९–२०२१) |
| ७. | श्री.विकास शेट्टी (मा.उपाध्यक्ष, व्यवस्थापकीय समिती सन २०१९–२०२१) |
| ८. | श्री.धनंजय वनमाळी (मा.सरचिटणीस, व्यवस्थापकीय समिती सन २०१९–२०२१) |
| ९. | श्री.हरशरणसिंग (मा.सरचिटणीस, व्यवस्थापकीय समिती सन २०१५–२०१८) |
| १०. | श्री.बी.पी.मंत्री (मा.खजिनदार, व्यवस्थापकीय समिती सन २०१९–२०२१) |

सदरच्या सभेस सभासदांची उपस्थिती कमी असल्यामुळे, सदरची सभा तहकुब करून अर्ध्या तासाने त्याच ठिकाणी सकाळी ठिक १०.३० वाजता सुरू करण्यात आली.

व्यवस्थापन समितीचे सरचिटणीस श्री.हरशरणसिंग यांनी जिमखान्याच्या २१ व्या वार्षिक सभेस उपस्थित असलेल्या जिमखान्याच्या सर्व सभासदांचे प्रथम स्वागत केले व जिमखान्याच्या २१ व्या वार्षिक सर्व साधारण सभेचे कामकाजास सुरूवात करण्यासाठी अनुमती मागीतली.

**विषय क्र.१ ः दिनांक १७ डिसेंबर २०१७ रोजी झालेल्या मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचुन त्यास मंजुरी देणे.**

**ठराव क्र.१ ः ठराव करण्यात येत आहे कि,** व्यवस्थापकीय समितीचे मा.सरचिटणीस श्री.हरशरणसिंग यांनी उपस्थित सर्व सदस्यांना सुचित केले की, दिनांक २० डिसेंबर २०१५ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेमधील ठरावानुसार अंतीम वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त आणि वार्षिक अहवाल हा सर्व सभासदांच्या माहितीसाठी संस्थेच्या वेबसाईटवर उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

श्री.हरशरणसिंग यांनी मागील सभेचे इतिवृत्त उपस्थित सदस्यांना वाचुन दाखविले असता, सदरच्या इतिवृत्तास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

सुचक ः श्री.संजय मुखर्जी (एल-३८८)
अनुमोदक ः श्री.राम बिस्नोई (एल-५०१)
ठराव सर्वानुमते मंजुर ...

**विषय क्र.२ ः सन २०१७-२०१८ चा वार्षिक अहवाल प्राप्त करून, त्याचा स्विकार करणे.**

**ठराव क्र.२ ः ठराव करण्यात येत आहे कि,** व्यवस्थापकीय समितीचे मा.सरचिटणीस श्री.हरशरणसिंग यांनी उपस्थित सर्व सदस्यांना सुचित केले की, सन २०१७-२०१८ चा वार्षिक अहवाल हा सर्व सभासदांच्या माहितीसाठी संस्थेच्या वेबसाईटवर उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

श्री.हरशरणसिंग यांनी सन २०१७-२०१८ चा वार्षिक अहवाल, उपस्थित सदस्यांना वाचुन दाखविला असता, सदरचा अहवाल सर्वानुमते मंजुर करण्यात आला.

सुचक ः श्री.मनोज कुमार ठाकुर (ल-१०८३)
अनुमोदक ः श्री.विष्णु जोशी (एफ-१२५८)
ठराव सर्वानुमते मंजुर ...

**विषय क्र.३ ः सन २०१७-२०१८ चा वैधानिक लेखापरिक्षण अहवाल व ताळेबंद पत्रक स्विकारून, त्यास मंजुरी देणे.**

**ठराव क्र.३ ः ठराव करण्यात येत आहे कि,** श्री.हिमांशु चौहान (एफ-९९७) यांनी प्रथम लेखापरिक्षण अहवालाबाबत असा मुद्दा उपस्थित केला की, मागील वर्षासाठी देखभाल शुल्क हे रू.१ कोटी वसुल झाले होते आणि सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षात जमा झालेल्या वर्गणीत घट होऊन ती रू.५७ लाख कशी काय झाली?

याबाबत खुलासा करताना श्री.शशी पांडे, मा.संस्था अध्यक्ष, व्यवस्थापकीय समिती यांनी सांगितले की, सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षात आम्ही ब-यापैकी मागील थकबाकी वसुल करू शकलो. परंतु सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षामध्ये बरेच प्रयत्न करूनही आम्ही जुनी वर्गणी वसुल करू शकलो नाही.

यानंतर श्री.हिमांशु चौहाण (एफ-९९७) यांनी विचारले की, ११०० हुन अधिक सदस्यांनी देखभाल शुल्क दिलेले नसल्यामुळे, ते भरण्यासाठी आपण काय उपाययोजना केल्या आहेत?

याबाबत खुलासा करताना श्री.विनू रैना, मा.अध्यक्ष, विश्वस्त मंडळ यांनी सांगितले की, मागील वार्षिक सर्वसाधारण सभेमधील ठरावानुसार, ज्या सदस्यांनी सन २०१६ पर्यंत देखभाल शुल्क दिलेले नाही अशा सदस्यांना थकबाकीदारांच्या यादीमध्ये टाकण्यात आलेले असुन, सदरचे सदस्य हे नेरूळ जिमखान्याच्या कोणत्याही सोई सुविधेचा लाभ घेण्यासाठी पात्र राहणार नाही. तसेच सदर सदस्यांना दंडात्मक कार्यवाही म्हणुन त्यांना दंड लागू करण्यात आलेला आहे.

संस्थेने सदरची थकबाकी वसुल करण्यासाठी अशा थकबाकीदार सदस्यांशी संपर्क साधुन सर्वतोपरी प्रयत्न केलेले आहेत. त्यापैकी सुमारे ११०० सभासदांपैकी ३०० सभासद अद्याप शोधता आलेले नाहीत.

श्री.हिमांशु चौहाण (एफ-९९७) यांनी पुढे विचारले की, व्यायामशाळेची मिळकत महसुल वाढलेली असुन, देखभाल खर्च देखील वाढलेला आहे. त्यामुळे संस्थेस निव्वळ तोटा होत आहे. सदरचा तोटा कमी करण्यासाठी आणि संस्था नफ्यामध्ये येण्यासाठी काय उपाय योजना केल्या जाऊ शकतात?

याबाबत खुलासा करताना श्री.शशी पांडे, मा.संस्था अध्यक्ष, व्यवस्थापकीय समिती यांनी सांगितले की, सुमारे ४ वर्षापुर्वी व्यायामशाळा ही मे. फिटनेस फर्स्ट यांच्यामार्फत चालविली जात असल्यामुळे, तोटा वाढत होता. त्यामुळे सदरचा करार रद्द करण्यात आलेला आहे. त्यानंतर व्यायामशाळेचे व्यवस्थापन नेरूळ जिमखान्याच्या व्यवस्थापकीय समितीने केले असता, आमच्या व्यवस्थापनाखाली व्यायामशाळा वापरणारे सदस्यांमध्ये चांगल्यापैकी वाढ झालेली आहे.

परंतु व्यायामशाळेची यंत्रसामग्री जुनी झालेली असल्यामुळे त्यांचा देखभाल खर्च हा वाढलेला असल्यामुळे, निव्वळ तोटयात वाढ होत आहे. व्यायामशाळा उपसमितीसह व्यवस्थापकीय समितीने उत्तम काम केलेले असुन, संस्थेचा निव्वळ तोटा कमी करण्यासाठी निविदा प्रक्रीयेव्दारे व्यायामशाळा सुस्थिथीत आणण्यासाठी नवीन व्यवस्थापन नियुक्त करण्यासाठीची प्रक्रीया सुरू करण्यात आलेली आहे.

सन २०१७–२०१८ चा वैधानिक लेखापरिक्षण अहवाल व ताळेबंद पत्रक हे ऑगस्ट मधील समितीने मंजुर केले.

सुचक : श्री. शेलाजी केसरकर (एफ–२४५)
अनुमोदक : श्री. विष्णु जोशी (एफ–१२५८)
ठराव सर्वानुमते मंजुर . . .

**विषय क्र. ४ : सन २०१८–२०१९ या आर्थिक वर्षासाठी लेखापरिक्षकांची नेमणूक करणे.**

**ठराव क्र. ४ : ठराव करण्यात येत आहे कि,** श्री. के. एल. भुव, मा. सल्लागार, विश्वस्त मंडळ यांनी सांगितले की, मागील वार्षिक सर्वसाधारण सभेमधील ठरावानुसार विश्वस्त मंडळाने लेखापरिक्षणासाठी निविदा अर्ज मागविले असता, ५ अर्ज प्राप्त झाले.

त्यापैकी २ अर्ज संस्थेच्या सदस्यांचे होते आणि ते संस्थेच्या हिताच्या विरोधात असण्याची शक्यता असल्यामुळे, ते अर्ज विचारात घेतले जाऊ शकत नव्हते. १ अर्ज चार्टर्ड अकाऊंटंटस यांचे कडून नसल्यामुळे, उर्वरीत १ अर्ज स्पर्धात्मक नसल्यामुळे सन २०१८–२०१९ या आर्थिक वर्षाच्या लेखापरिक्षणासाठी मेसर्स हवा आणि कंपनीची निवड करण्यात आली आणि त्यांचे एकत्रित लेखापरिक्षण शुल्क रू. ९,000.00 इतके आहे.

**मेसर्स हवा आणि कंपनी चार्टर्ड अकाऊंटंटस, मुंबई यांना २०१८–२०१९ या आर्थिक वर्षा साठी लेखापरिक्षक म्हणून नियुक्त केले गेले आणि त्यांचे मानधन ठरविण्यासाठी विश्वस्तांना आवश्यक ते निर्णय घेण्यास अधिकृत केले गेले.**

श्री. गोपाल जगवाणी (एफ–१०८७) यांनी विचारले की, वेबसाईटवर अंतर्गत लेखापरिक्षकांचा अहवाल का अपलोड करण्यात आलेला नाही. तसेच नेरूळ जिमखान्यासाठी अंतर्गत तांत्रिक लेखापरिक्षक देखील नेमला पाहिजे असेही सुचविले.

श्री. शशी पांडे, मा. संस्था अध्यक्ष, व्यवस्थापकीय समिती यांनी सांगितले की, २ सदस्यांनी अंतर्गत लेखापरिक्षक म्हणुन कामकाज पाहिले आहे.

त्यापैकी श्री.दिनेश शर्मा (एफ-५४३) हे अंतर्गत लेखापरिक्षक असुन, त्यांनी आपले निरीक्षण सांगावे अशी सुचना केली.

यास श्री.दिनेश शर्मा (एफ-५४३) यांनी समंती देऊन सांगितले की, श्री.विनू रैना, मा.अध्यक्ष, विश्वस्त मंडळ यांनी विनंती केली की, अजुन एका सदस्याने अंतर्गत लेखापरिक्षक म्हणुन पुढे यावे. श्री.विष्णु जोशी (एफ-१२५८) जे स्वतः चार्टर्ड अकाऊंटंट आहेत त्यांनी ही जबाबदारी घेण्यास ते इच्छुक असल्याचे सांगितले.

श्री.विनू रैना, मा.अध्यक्ष, विश्वस्त मंडळ यांनी श्री.गोपाल जगवाणी (एफ-१०८७) यांना तांत्रिक लेखापरिक्षणासाठी पुढाकार घेण्यास विनंती केली असता, श्री.गोपाल जगवाणी (एफ-१०८७) यांनी त्यासाठी सहमती दर्शविली.

श्री.विष्णू जोशी (एफ-१२५८) यांनी अंतर्गत लेखापरिक्षण अहवालासाठी सुचना केली असता, अंतर्गत लेखापरिक्षक असलेल्या श्री.दिनेश शर्मा (एफ-५४३) यांनी सांगितले की, नेरूळ जिमखान्याच्या संविधानात अंतर्गत लेखापरिक्षकांची तरतूद नाही आणि ते आवश्यक नाही.

श्री.अनिलकुमार कर्था (एफ-४६) यांनी सांगितले की, अंतर्गत लेखापरिक्षकांची पात्रता निश्चित केली पाहिजे आणि नंतर अधिसुचनेव्दारे विश्वस्त मंडळाने आवश्यक असल्यास नियुक्ती केली पाहिजे. (व्यावसायिक तसेच तांत्रिकरित्या)

श्री.विष्णू जोशी (एफ-१२५८) यांनी सुचविले की, अंतर्गत लेखापरिक्षक हे आर्थिक बाबी हाताळतील तसेच आवक वर लक्ष ठेवतील त्यामुळे अधीकचे उत्पन्न मिळेल.

श्री.के.म.भास्करण (एल-१०२३) यांनी असे म्हटले की, अंतर्गत लेखापरिक्षक सल्लागार पातळीवरील व्यवस्थापन समितीचा भाग असावा आणि त्यासाठी तरतूद करणे आवश्यक आहे.

श्री.शेलजी केसरकर (एफ-२४५) म्हणाले की, वार्षिक सर्वसाधारण सभा ही लेखापरिक्षकांना नियुक्त करू शकेल. अंतर्गत लेखापरिक्षकाने संस्थेमध्ये होणा-या त्रुटी ओळखता आल्या पाहिजेत. तसेच त्यांनी प्रत्येक तीन महिन्यातुन एकदा अंतर्गत लेखापरिक्षण अहवाल सादर करावा. अंतर्गत लेखापरिक्षकाने केवळ व्यवस्थापन समितीशी समन्वय साधावा अशी सुचना केली.

तसेच सदरचे अहवाल हे गोपनीय असले पाहिजे आणि त्यांनी वर्षाच्या अंतिम हिशोबाच्या वेळेच्या चर्चेत सहभागी व्हायला हवे.

श्री.बालसुब्रम्हण्यम के. (पी-४) यांनी अंतर्गत लेखापरिक्षकांच्या कामाची व्याप्ती आणि त्यांची पात्रता निश्चित करण्याची गरज यावर भर दिला.

श्री.राजेश पुजारी, मा.सल्लागार, विश्वस्त मंडळ म्हणाले की, जर अंतर्गत लेखापरिक्षक हे व्यवस्थापकीय समितीच्या दैनंदिन नियमित कामकाजामध्ये व्यत्यय आणत असेल तर ते जिमखान्याच्या हिताच्या विरोधात राहील. अंतर्गत लेखापरिक्षक म्हणून सदस्य त्यांचे नाव स्वच्छेने देऊ शकतात. विश्वस्त अंतर्गत लेखापरिक्षकांची निवड आधी ठरविलेल्या नियमांनुसार करतील.

श्री.विष्णू जोशी (एफ-१२५८) यांनी विश्वस्तांना अंतर्गत कामकाजाच्या नियुक्त केलेल्या सदस्यांची योग्यता आणि पात्रता निश्चित करण्यासाठी सुचित केले.

श्री.अर्जुन नाईक (एफ-९०) यांनी सुचविले की, अंतर्गत लेखापरिक्षकांबावत संविधानात तरतुद नसल्यास आपण तशी तरतुद संविधान दुरूस्ती करून ती स्विकारावी. तसेच स्वेच्छेने पुढाकार घेतलेल्या सदस्यांचे नाव, वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये अंतर्गत लेखापरिक्षक म्हणून निश्चित केले पाहिजे आणि ते वेबसाईटवर नोंद केले पाहिजे.

श्री.संजय मुखर्जी (एल-३८८) यांनी सांगितले की, अंतर्गत लेखापरिक्षकांनी व्यवस्थित कामाची सुरूवात केली आहे. समितीने केवळ कार्यपध्दतीकडे पाहिले असुन आर्थिक बाबींमध्ये लक्ष घातले नाही. संस्थेसाठी वेळ देण्यास समिती अपयशी ठरली आहे. त्यांनी अंतर्गत लेखापरिक्षक असलेले स्वयंसेवक हे आम्ही स्वयंसेवक म्हणून काम करू असे निश्चित व लिखित स्वरूपात असावे यावर भर दिला.

श्री.विनय राव (एफ-१४१४) यांनी असे सुचविले की, आर्थिक लेखापरिक्षका हे अर्थशास्त्रामध्ये पारंगत असले पाहिजे आणि तांत्रिक लेखापरिक्षक तांत्रिकदृष्ट्या पात्र असावेत. नियुक्तीची प्रक्रीया सुरू होण्याआधी त्यांच्या पात्रतेबद्दल पारदर्शकता निश्चित केली पाहिजे.

श्री.के.एल.भुव, मा.सल्लागार, विश्वस्त मंडळ यांनी सांगितले की, कायद्यानुसार वैधानिक लेखापरिक्षण अनिवार्य आहे. अंतर्गत लेखापरिक्षण अनिवार्य नाही.

अंतर्गत लेखापरिक्षकांच्या संदर्भात विश्वस्तांच्या पूर्ततेमध्ये अंतर्गत लेखापरिक्षकांचे दायित्व, त्यांची पात्रता, निवडीची पध्दत आणि आवश्यकता असल्यास नियुक्तीची व्याख्या निश्चित केली पाहिजे.

श्री.विनू रैना, मा.अध्यक्ष, विश्वस्त मंडळ यांनी सांगितले की, श्री.कन्हैयालाल भूब, मा.सल्लागार, विश्वस्त मंडळ यांच्या सुचनेनुसार विश्वस्तांनी अंतर्गत लेखापरिक्षकांची नेमणूक केली पाहिजे.

श्री.हरशरणसिंग, मा.सरचिटणीस, व्यवस्थापकीय समिती यांनी श्री.स्टॅनले आय.ग्लॅडस्टोन (एल-९९१) यांचेकडून प्राप्त झालेल्या पत्राचे वाचन केले. श्री.हरशरणसिंग, मा.सरचिटणीस, व्यवस्थापकीय समिती यांनी सांगितले की, मागील वार्षि क सर्वसाधारण सभेमधील तक्रारीमुळे टेनिस प्रशिक्षक बदलला नव्हता तर प्रशिक्षक पदाचा कार्यकाल हा ५ वर्षे होता म्हणून बदलला होता. कार्यकाल पूर्ण झाल्यावर, प्रशिक्षक पदासाठी निविदा मागविण्यात आल्या. आम्हाला ३ निविदा प्राप्त झाल्या. सर्वात स्पर्धात्मकदृष्टया कमी असलेली निविदा स्विकारण्यात आली व प्रशिक्षक नेमण्यात आला.

सदस्यांसाठी टेनिस स्पर्धा का झाल्या नाहीत याबद्दल विचारणा झाली असता श्री.हरशरणसिंग, मा.सरचिटणीस, व्यवस्थापकीय समिती (सन २०१५-२०१८) यांनी उत्तर दिले की, जानेवारी २०१९ मध्ये जिमखान्याच्या सदस्यांसाठी स्पर्धा आयोजीत केल्या जातील. श्री.हरशरण सिंग, मा.सरचिटणीस, व्यवस्थापकीय समिती (सन २०१५-२०१८) यांनी अशी शिफारस केली की, एक मैदान सदस्यांसाठी आरक्षित असावे. प्रति तास शुल्क कमी करण्याच्या श्री. ग्लॅडस्टोन स्टॅनली (एल-९९१) यांच्या सूचनेबद्दल श्री.हरशरणसिंग मा.सरचिटणीस, व्यवस्थापकीय समिती (सन २०१५-२०१८) यांनी उत्तर दिले की, व्यवस्थापकीय समिती आर्थिक दृष्टिकोन पाहतील आणि त्यानुसार निर्णय घेतील.

**विषय क्र.५ ः नेरूळ जिमखान्याच्या २०१८-२०२१ सालासाठी नवीन व्यवस्थापन समितीची निवड करणे.**

**ठराव क्र.५ ः ठराव करण्यात येत आहे कि,** श्री.शशी पांडे, मा.संस्था अध्यक्ष, व्यवस्थापकीय समिती यांनी आर.सी.विष्णोई, निवडणूक अधिकारी यांना सन २०१८-२०२१ या कालावधीसाठी व्यवस्थापकीय समितीच्या निवडणुकीबद्दल आपले मत व्यक्त करण्याचे आवाहन केले असता, श्री.आर.सी.बिष्णोई, निवडणूक अधिकारी यांनी सांगितले की, निवडणुकीच्या

वेळी श्री.शेलाजी केसरकर (एफ-२४५) यांनी सदस्यांचा दूरध्वनी क्रमांक आणि पत्ता मिळावा यासाठी विनंती केली त्यावेळी सदस्यांची यादी यादी त्यांना देण्यात आली परंतु त्यावर सदस्यांचे पत्ते नव्हते. कारण नेरूळ जिमखान्याच्या नियम व नियमांनुसार ते गोपनीय आहेत. नेरूळ जिमखाना प्रगतीपथावर आणण्यासाठी भूतकाळातील समिती आणि विश्वस्तांनी केलेल्या प्रयत्नांचे त्यांनी कौतुक केले. त्यांनी प्रत्येक सदस्याला नेरूळ जिमखाना आपली स्वतःची संस्था असल्याचे मानण्याची विनंती केली तसेच त्यांच्या सुचनांचा हेतू स्पष्ट असावा असेही सांगीतले. कार्यक्रमांमध्ये जास्तीत जास्त सभासदांनी सहभागी होण्याची सूचना त्यांनी केली. त्यांनी केलेल्या निरिक्षणावरून खालीलप्रमाणे सूचना केलेल्या आहेत.

- सदस्यांनी धोरणांचे चांगल्यारित्या पालन झाले पाहिजे.
- कार्यशैली आणि कार्यपध्दती उच्च स्तरावर व जलद गतीने पार पडण्यासाठी स्वयंगतीमान (ऑटोमोशन) झाले पाहिजे पाहिजे.

निवडणूक अधिकारी म्हणून त्यांच्यावर विश्वास दाखविल्याबद्दल त्यांनी संस्थेचे जाहीर आभार मानले. श्री.आर.सी.बिष्णोई, निवडणूक अधिकारी यांना मा.अध्यक्ष, मा.सचिव, विश्वस्त मंडळ सभापतींनी स्मृतिचिन्ह सादर करून प्रशस्त पध्दतीने निवडणूक अधिकारी म्हणून आपले कर्तव्य उत्कृष्टरित्या पार पाडल्याबद्दल त्यांचा सन्मान करण्यात आला. श्री.हिमांशु चव्हाण (एफ-९९७) यांनी सुचविले की, “ओपन एयर कॉफी शॉप” चा गाळा हा कार्यालयाच्या जवळ असावा. कारण आत्ताची जागा जी स्वागत कक्षाजवळ आहे, तिथे खुप गर्दी होते. त्यांनी असेही सुचविले की, कॉफीच्या दुकानाने जास्त मिळकत प्राप्त होईल व सदस्यांमध्ये सुसंवाद होईल.

**विषय क्र.६ ः आयत्या वेळच्या विषयावर विचार विनिमय करणे.**

**ठराव क्र.६ ः ठराव करण्यात येत आहे कि,** श्री.शशी पांडे, मा.संस्था अध्यक्ष, व्यवस्थापकीय समिती यांनी सुचित केले की, व्यवस्थापकीय समिती श्री.हिमांशु चव्हाण (एफ-९९७) सुचनेकडे लक्ष देईल.

श्री.विष्णू जोशी (एफ-१२५८) यांनी विचारले की, ड्राय डे ला रेस्टॉरंट बंद का असते? या बाबत श्री.विनू रैना, मा.अध्यक्ष, विश्वस्त मंडळ यांनी उत्तर दिले की, ड्राय डे

ला सदस्यांची ये-जा कमी असते, त्यामुळे ते व्यवहार्य नाही. परंतु एफएल-४ परवाना मिळाल्यानंतर रेस्टॉरंट ड्राय डे ला चालू ठेवण्यात येईल.

श्री.हरशरणसिंग, मा.सरचिटणीस, व्यवस्थापकीय समिती यांनी विश्वस्त मंडळ, व्यवस्थापकीय समितीचे सदस्य, उपसमिती सदस्य, कर्मचारी आणि सेवा पुरवठादार यांचा मागील कार्यकाल हा स्मरणीय असा असल्याबद्दल ते कौतुकास पात्र आहेत असे सांगत त्यांच्या सहकार्यासाठी व दिलेल्या पाठींब्याबद्दल धन्यवाद व्यक्त केले.

श्री.विनू रैना, मा.अध्यक्ष, विश्वस्त मंडळ यांनी मुदत संपलेल्या व्यवस्थापकीय समितीचे आभार मानले आणि जिमखान्याला एक उत्साहपूर्ण बनविण्यासाठी केलेल्या प्रयत्नांबद्दल त्यांचे कौतुक केले. श्री.विनू रैना, मा.अध्यक्ष, विश्वस्त मंडळ यांनी सांगितले की, श्री.हरशरणसिंग, मा.सरचिटणीस, व्यवस्थापकीय समिती (२०१५-२०१८) यांना विश्वस्त म्हणुन नामांकन देण्यात आले आहे. श्री.हरशरण सिंग, मा.सरचिटणीस, व्यवस्थापकीय समिती (२०१५-२०१८) यांनी धनंजय वनमाळी, मा.सरचिटणीस, व्यवस्थापकीय समिती (२०१९-२०२१) यांना सर्व नवनियुक्त सदस्यांची सर्वसाधारण सभेपुढे ओळख करून देण्याची विनंती केली. २०१९-२०२१ या कालावधीसाठी खालील संघाची व्यवस्थापकीय समिती म्हणुन नियुक्ती करण्यात आली.

| अ.क्र. | हुद्दा | सदस्याचे नांव |
|---|---|---|
| १. | माननीय संस्था अध्यक्ष | श्री.शशी पांडे |
| २. | माननीय उपाध्यक्ष | श्री.विकास शेट्टी |
| ३. | माननीय सरचिटणीस | श्री.धनंजय वनमाळी |
| ४. | माननीय संयुक्त सरचिटणीस | श्री.विनय राव |
| ५. | माननीय खजिनदार | श्री.भगवान प्रसाद मंत्री |
| ६. | सदस्य निवडून आलेले | श्री.शरद कथुरिया |
| ७. | सदस्य निवडून आलेले | श्री.राजीव सुद |
| ८. | सदस्य निवडून आलेले | श्री.किरण डेविड स्टॅनली |
| ९. | सदस्य निवडून आलेले | श्री.रमेश गुलावांनी |
| १०. | स्विकृत सदस्य | श्री.आर. श्रीनिवासमुर्ती |
| ११. | स्विकृत सदस्य | श्री.सतीश श्रीराम कडू |

| अ.क्र. | हुद्दा | सदस्याचे नांव |
|---|---|---|
| १२. | स्विकृत सदस्य | श्रीमती किर्ती नितीन मंगुडकर |
| १३. | विश्वस्तांनी नामांकित केले | श्री.हरशरणसिंग धारणी |
| १४. | विश्वस्तांनी नामांकित केले | श्री.अनिलकुमार कर्था |

श्री.विनू रैना, मा.अध्यक्ष, विश्वस्त मंडळ यांनी सांगितले की, श्री.शशी पांडे यांची व्यवस्थापकीय समितीचे माननीय अध्यक्ष म्हणून निवड केलेली आहे. श्री.अनिलकुमार कर्था आणि श्री.हरशरणसिंग धारणी यांची विश्वस्त मंडळामधून व्यवस्थापकीय समितीचे प्रतिनिधी म्हणून (सन २०१८-२०२१) या कालावधीसाठी निवड करण्यात आलेली आहे.

**विषय क्र.७ ः फेज – २ आणि नवीन सभासद नोंदणी**

श्री.विनू रैना, मा.अध्यक्ष, विश्वस्त मंडळ यांनी सांगितले की, श्री.शशी पांडे, मा.अध्यक्ष, व्यवस्थापकीय समिती यांच्या मदतीने आम्ही आमचा इमारतप्रकल्प प्रगती पथाकडे नेऊ शकलो.

श्री.विनू रैना, मा.अध्यक्ष, विश्वस्त मंडळ यांनी सभेस कळविले की, नेरूळ जिमखान्याची एकूण थकबाकी रू.१४ कोटीची आहे. नवीन गोलाकार इमारतीच्या अंतर्गत सजावटीसाठी निधीची आवश्यकता आहे. त्यांनी सदस्यांना त्यांच्या कुटूंबातील आणि मित्र मंडळीतील कमीत कमी एक नवीन सदस्य नोंदणी करण्याबाबत विनंती केली.

श्री.अनिलकुमार कर्था(एफ-४६) यांनी सभासदांना मार्केटिंग ड्राईव्हमध्ये सहभागी होण्यासाठी निमंत्रीत केले.

श्री.शशी पांडे, मा.अध्यक्ष, व्यवस्थापकीय समिती यांनी उत्तर दिले की, आम्ही मार्केटिंग ड्राईव्हची योजना आखत आहोत.

श्री.राजीव सूद (एफ-१६२५) यांनी कार्पोरेट सदस्य नोंदणी वर काम करण्याची शिफारस केली. कारण बरेच कार्पोरेट क्षेत्र नवी मुंबईला स्थानांतरीत करण्यात येत आहे.
श्री.लक्ष्मण सूर्यवंशी (एल-६३९) यांनी जिमखान्यासाठी, आपली सेवा देण्याची तयारी दर्शविली.

श्री.अनिलकुमार कर्था (एफ-४६) यांनी नवीन इमारतीच्या आतील रचनेचा पुन्हा अभ्यास करण्याचे सुचित केले.

श्री.राजेश पुजारी, मा.सल्लागार, विश्वस्त मंडळ यांनी भूतकालीन आणि विद्यमान समिती सदस्यांनी केलेल्या निरंतर प्रयत्नांबद्दल आभार मानले. तसेच श्री.हरशरणसिंग यांच्या मार्ग दर्शनाखाली संपूर्ण जिमखान्याचा कल्पकतेने वापर केल्याबाबत व्यवस्थापन समितीची प्रशंशा केली.सदस्यांना सहभागास आकर्षित करण्यासाठी सदस्यांना प्रवेश शुल्काशिवाय एक दिवस सुविधांचा लाभ घेण्याची परवानगी देण्याचे सुचीत केले.

श्री.रागीब शाईख (एफ-१५९२) यांनी नेरूळ जिमखान्यासाठी केलेल्या कामांचे कौतुक केले आणि नवीन समितीच्या सदस्यांबाबत प्रशंषा केली.

श्री.कमलेश ठक्कर (एफ-१८५) यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले.

राष्ट्रगीत गायनानंतर संस्थेची २१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न झाल्याबाबत जाहीर करण्यात आले.